**नियमित दरखास्त क्र.१६/२०१६**
**मधील नि.क्र.१ खालील आदेश**
**(CNR No.MHWS050002922016 )**

१) सदरची दरखास्त आजरोजी खारीज करण्याच्या आदेशासाठी नेमलेली आहे.

२) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, धनको सौ. कविता रविंद्र परवाळे, रा. सोनखास, मंगरुळपीर ता. मंगरुळपीर जि. वाशिम यांनी प्रस्तुतची दरखास्त ही हिंदू विवाह अर्ज क्र. ९२/२००९ मधील दिनांक ११.४.२०२२ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार व हुकूमनाम्यानुसार दाखल केलेली आहे. या अर्जात ऋणको हे वकीलपत्र निशाणी क्र. ६ नुसार दिनांक ९.२.२०१७ रोजी यामध्ये हजर झाले. या दरखास्तीमध्ये दिनांक ९.६.२०१७ पासून धनको हिने पुर्तता करण्यासाठी एकही अर्ज दिलेला नाही. त्यामुळे निशाणी क्र. १ खालील दिनांक १३.६.२०२५ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुतची दरखास्त खारीज करण्याच्या आदेशासाठी नेमली. या दरखास्तमधील शेवटचा अर्ज निशाणी क्र.८ हा दिनांक २८.८.२०२५ रोजी धनको हिने पुढील पुर्तता करण्यासाठी मुदत मिळावी म्हणून दिलेला आहे. तरीही धनको हिने दिनांक ३०.९.२०२५, २६.११.२०२५, २.१.२०२६, ७.१.२०२६ आणि ५.२.२०२६ या तारखांना धनको ही गैरहजर राहिली.

३) आजरोजी सुध्दा पुकारले असता धनको ही गैरहजर आहेत. धनको हिने दिनांक ९.६.२०१७ पासून आजतागायत पुर्तता करणेसाठी अर्ज दिलेला नाही व ती सतत गैरहजर आहे. मा. उच्च न्यायालया यांनी वेळोवेळी ५ वर्षावरील प्रकरणे त्वरील निकाली काढावीत असे वेळोवेळी आदेशीत केलेले आहे. प्रस्तुतची दरखास्त हि ९ वर्षे ०३ महिने इतकी जुनी आहे. धनको हिच्या सततच्या गैरहजेरीमुळे असे दिसून येते की, धनको हिस सदरची दरखास्त यापुढे चालवायची नाही. त्यामुळे अशी प्रस्तुतची दुर्लक्षित दरखास्त अभिलेखावर न्यायप्रविष्ठ ठेवून काहीही उद्देश साध्य

होणार नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**आदेश**

१] धनको हिने प्रस्तुतची दरखास्त चालविली नसल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.

२] खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.03.16 16:32:17 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक :१६.३.२०२६.

(ध. भ. हंबीरे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D., Mangrulpir |
| Date of Decision | : | 16.3.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 16.3.2026 |
| Order uploaded on | : | 16.3.2026 |